# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.05.2025** **वार- सोमवार**

---

**<u>बारावीचानिकाल</u>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं यावर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. यंदा या परीक्षेत 91 पूर्णांक 88 शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यातील नऊ विभागीय मंडळातून 14 लाख 17 हजार 969 विद्यार्थी या परीक्षेला बसले होते, त्यापैकी 13 लाख 2 हजार  873 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या वर्षीपेक्षा यंदाचा निकाल जवळ जवळ दीड  टक्क्यानं घटला आहे. नेहमीप्रमाणे याही परीक्षेत मुलींच्या उत्तीर्णतेचं प्रमाण अधिक आहे; यंदा 94 पूर्णांक 58 टक्के मुली आणि 89 पूर्णांक 51 टक्के मुलं उत्तीर्ण झाली आहेत. कोकण विभागाची उत्तीर्णतेची टक्केवारी सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा आहे. पुणे विभागात 91 पूर्णांक 32 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दरम्यान अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षा देता येणार आहे, ही परीक्षा येत्या जून आणि जुलैमध्ये होईल. विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी उद्यापासून म्हणजेच 6 मेपासून 20 मेपर्यंत  अर्ज करता येतील.

**<u>उदयसामंत</u>**

संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र आळंदी इथं सुरू असलेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण आणि अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याला मंत्री उदय सामंत यांनी

आज भेट दिली. यावेळी त्यांनी भाविकांशी संवाद साधला, तसंच शासनाच्या निर्णयांची माहिती दिली. आळंदी देवस्थानला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रतीच्या छपाईसाठी एक कोटी रुपये देणार असल्याची घोषणा सामंत यांनी यावेळी केली.

**<u>जिल्हाधिकारी</u>**

पुणे जिल्ह्यात अतिक्रमित आणि बंद असलेले पाणंद, शिव रस्ते वापरण्यास खुले करण्यासाठी या वर्षाच्या सुरुवातीपासून मोहीम हाती घेण्यात आली आहे; एप्रिलअखेर ७०४ किलोमीटर लांबीचे ५३८ रस्ते वापरण्यास खुले करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. जिल्ह्यातील गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित आणि बंद झालेले पाणंद, शिव रस्ते खुले करुन घेण्याकरता नागरिकांनी तहसीलदारांकडे 31 मे पर्यंत अर्ज करावेत, असं आवाहन डुडी यांनी केलं आहे.

**<u>पीएमपी</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात पीएमपीएमएलच्या रातराणी सेवेला गेल्या वर्षभरात एक कोटी रुपयांचं उत्पन्न मिळालं आहे. पीएमपीनं सहा मार्गांवर ही रातराणी सेवा सुरू केली असून आणखी काही मार्गांवर बस सुरू करण्याची मागणी प्रवाशांकडून होत असल्याचं पीएमपीचे सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर यांनी सांगितलं.

**<u>चर्चासत्र</u>**

सजग नागरिक मंचाच्या मासिक चर्चासत्रात ‘पुण्यातील टेकड्यांचे भवितव्य’ या विषयावर विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. टेकड्या ही पुण्याची ओळख आहे. शहर जिवंत राहावे म्हणून टेकड्या जिवंत राहायला हव्यात. टेकड्यांचं संवर्धन गरजेचं आहे; तिथे अनधिकृत बांधकामं नकोत, असं मत माजी खासदार वंदना चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केलं. ज्येष्ठ नगररचनाकार अनिता बेनिंजर, ‘भाजप’ चे ज्येष्ठ नेते उज्ज्वल केसकर, ‘शिवसेने’ चे प्रशांत बधे यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला.

**महिलाशेतकरीसंमेलन**

महिला शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी महिला किसान अधिकार मंचातर्फे येत्या ७ ते ९ मे दरम्यान पुण्यात तीन दिवसांच्या राष्ट्रीय महिला शेतकरी संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रात हे संमेलन होणार आहे. देशभरातील ५००हून अधिक महिला शेतकरी, विविध शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील शिक्षणतज्ज्ञ या संमेलनात सहभागी होणार आहेत. या संमेलनाच्या अनुषंगानं  बियाणे, विविध शेती उत्पादनांचं प्रदर्शन तसंच विविध सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत.

**व्याख्यानमाला**

निगडी प्राधिकरणातील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळानं नुकतंच छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेचं आयोजन केलं होतं. १ ते ४ मे या कालावधीत झालेल्या या व्याख्यानमालेत खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी 'वक्फ कायदा समजून घेताना...' या विषयावर मार्गदर्शन केलं. शिवव्याख्याते नीलेश भिसे यांचं 'धर्मरक्षक छत्रपती संभाजीमहाराज'; डॉक्टर शैलेंद्र देवळाणकर यांचं 'अमेरिकन टॅरिफच्या भयकंपाचे वास्तव'; तर समीर लिमये यांचं 'श्री समर्थांचं नेटवर्किंग' या विषयावर व्याख्यान झालं.

**बुद्धीबळ**

भारतीय बुद्धिबळ संघटना, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना, पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल च्या मान्यतेने पुण्यात पहिली एसव्हीआयएस ओपन फिडे रेटिंग रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा झाली. यामध्ये महाराष्ट्राचा विरेश शरणार्थी विजेता ठरला. नवव्या फेरी अखेर त्याने साडेआठ गुणांची कमाई केली. तर पश्चिम बंगालचा निलेश सहाय दुसऱ्या तर महाराष्ट्राचा अथर्व मडकर तिसऱ्या स्थानावर राहिले.  माधवी देवस्थळी उत्कृष्ट

वरिष्ठ खेळाडू ठरल्या. अक्षद कावळे याने दिव्यांग गटात प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत देशभरातून ३२७ बुद्धिबळपटूंनी भाग घेतला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 38 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 21 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**